# हा खेळ सावल्यांचा

शिरीष पै

परचुरे

# हा खेळ सावल्यांचा

●

शिरीष पै

●

प्रकाशन क्रमांक
३५९

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबअी ४

मूल्य तीन रुपये

प्रकाशक :
विष्णु गजानन परचुरे
ग. पां. परचुरे; प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ क्र. २
गिरगांव, मुंबअी ४

आवृत्ति पहिली :
दि. ४ नोव्हेंबर १९६८

नाट्यपरीक्षण मंडळ
महाराष्ट्र राज्य
मंजुरी क्रमांक
डी आर एम ७४० / ६८
२-८-१९६८

© शिरीष पै

मुखपृष्ठ सजावट :
श्री. मोहन वाघ

मुद्रक :
आर. के. मूर्ति
महाराष्ट्र पेपर्स प्रा. लि.
अत्रे आर्टस्, शिवडा रोड,
वरळी, मुंबअी १८.

# म नो ग त

प्रथमतःच मला आभार मानले पाहिजेत ते प्राध्यापक ए. वि. जोशी यांचे. कारण त्यांची 'काळोखाचे अंग' ही कादंबरी माझ्या हातात पडली नसती तर हे नाटक कदाचित् माझ्या हातून लिहिले गेलेच नसते. कदाचित् दुसरें एखादें नाटक मी लिहिले असतें. पण 'हा खेळ सावल्यांचा' हे नाटक लिहिताना मनाला जे समाधान लाभले ते खात्रीने अनुभवता आले नसते. 'काळोखाचे अंग' ही कादंबरी मी वाचली मात्र, आणि अक्षरशः त्या कादंबरीनें मला झपाटून टाकले. ती वाचत असतानाच हे नाटक मनात उभे राहिले, आकार धारण करू लागले. कादंबरीतल्या व्यक्ती जिवंत होऊन माझ्या समोर उभ्या राहिल्या, सतत माझ्या आसपास वावरू लागल्या, आपली सुखदुःखे माझ्याजवळ बोलू लागल्या. जिथें मी जाईन तिथें मला त्या दिसू लागल्या. वर्षानुवर्षे मनात खूपसें काही साठून राहिले होतें. त्याला एकाएकी तोंड फुटलें. हें नाटक लिहिल्या-शिवाय मग गत्यंतरच राहिलें नाही. असें असह्य होऊन अगदी मनापासून जेव्हां लिहिलें जातें तेव्हांच मला खरोखरी लिहिल्याचा आनंद मिळतो. मग तें लिहिलेलें कुणाला पटो, न पटो. असा अपूर्व आनंद मला 'काळोखाचे अंग' ह्या कादंबरीवरून 'हा खेळ सावल्यांचा' हे नाटक लिहिताना लाभला.

# अंक पहिला

[ घनश्यामच्या घराचा दिवाणखाना. रात्र पडली आहे. दिवाणखान्यांत कोणी नाही. मंद संगीत. दिवाणखान्यांत मंद प्रकाश. इतक्यांत बाहेरच्या पोर्चमध्यें मोटर येऊन थांबल्याचा आवाज. मग एकदम हसण्या-खिदळण्याचा आवाज. घनश्याम आणि दमयंती प्रवेश करतात. गाढ प्रेमांत असलेल्या प्रेमिकांप्रमाणें एकमेकांना बिलगून येतात. ]

**घनश्याम** : (बैठकीवर बसत) छेः! अगदीच भिकार होता आजचा सिनेमा. घरांत आल्यावर कसं बरं वाटलं. घर इतकं शांत कसं ? मुलं झोपलेली दिसतात—(आतल्या खोलीकडे जात) बाबा—ए बाबा—राणी—ए राणी—

**दमयंती** : (उठून त्याच्यामागे जात) अरे ओरडतोस कशाला ? मुलं उठतील ना ! मीच जातांना लक्ष्मीला सांगून गेले होते की आम्ही यायच्या आत त्यांना झोपवून टाक.

**घनश्याम** : (आंत डोकावीत) बघ, बघ. कशी गाढ झोपली आहेत. मुलं झोपल्यावर किती सुंदर दिसतात नाहीं दमयंती ? किती निष्पाप. अग बघ, बघ (आत जातो)

**दमयंती :** (दा ातून) अरे उठवू नकोस रे त्यांना. श्याम, ऐक माझं. अरे जागी होतील ना ती. मग 'आम्हाला बरोबर कां नेलं नाहीं' म्हणून कांगावा करतील. (आत जाते) अरे नको रे हलवूस त्यांना. असं काय करतोस ! (त्याला ओढतच बाहेर घेऊन येते.) मुलांची झोप मोडू नये कधी.

**घनश्याम :** (ए हां आत डोकावीत) कशी छान झोपली आहेत. बाबाचे ओठ झोपेत हलत हेत. झोपेतसुद्धां पोरटं कुणाशी तरी भांडत असतं. आणि राणी भावलीला पाटाशी घट्ट धरून झोपली आहे. ती लहान होती तेव्हां तूं तिला जवळ घेऊन झोपायचीस ना तशी. तिचा एक गोड गोड पापासुद्धां घेतला मी.

**दमयंती :** कशाला त्यांना त्रास देतोस रे असा. तू सुद्धां कमाल करतोस. मुलं झोपलेली पाहिली की तुझं प्रेम उसळून येतं. मग जातोस त्यांचे गाल कुस्करायला आणि त्यांच्या अंगाला गुदगुल्या करायला. दिवसा खेळत असतात तेव्हां त्यांच्याकडे बघायला वेळ नसतो तुला. आधी असतोस कुठं मानावर ? सारा वेळ काम—काम—काम. आज इतका हट्ट घेतला मी लहान मुलासारखा तेव्हां कुठं इतक्या दिवसांनी माझ्याबरोबर बाहेर पडलास सिनेमा पहायला.

**घनश्याम :** (बसत) आता बोलू नकोस पाहू—अशी माझ्याजवळ बस पाहू. आज घर कसं गप्प आहे—आज फक्त तू आणि मी—आजचा सगळा दिवस फक्त आपल्या दोघांचाच—ये ना—अशी जवळ ये ना माझ्या—(तिला ओढून जवळ बसवतो) घरांत अशी शांतता असावी आणि तू अशी जवळ असावीस. बस—इतकं साधं आणि सरळ मागणं आहे माझं.

**दमयंती :** (त्याला लाडिकपणें दूर लोटीत) पुरे, पुरे. आज तुझ्या प्रेमाला भलताच पूर आला आहे. थिएटरमध्यें तर तू अगदी कमालच केलीस. (हसून) जसं कांहीं कालच लग्न लागलं आपलं. शी:, आजूबाजूचे लोक काय म्हणाले असतील ?

**घनश्याम :** आजूबाजूच्या लोकांचं सुद्धां तेंच चाललं होतं.

**दमयंती :** तर तर ! समोरच्या पडद्याकडे तुझं धड लक्षच नव्हतं. किती दिवसांनीं आज आपण सिनेमा बघायला गेलो.

**घनश्याम :** बाकं कांहीं म्हण तू दमयंती. आजचा सिनेमा मला कांहीं



आवडला नाहीं. म्हणजे तशी कामं बरी केली आहेत सगळ्यांनीं. डायरेक्शन चांगलं होतं. देखावे चांगले होते. पण गोष्ट नाहीं आवडली मला.

**दमयंती :** मला वाटलंच होतं तुला सिनेमा आवडणार नाहीं म्हणून

**घनश्याम :** खरंच सांगतो. मला नाहीं आवडली ती गोष्ट. त्या बाईनं काम चांगलं केलंय. पण इतकं प्रेम करणाऱ्या नवऱ्यापाशी अशी बेमानी. (उठत) नाहीं दमयंती—जे समोर घडत होतं ते सहनच होईना. याकरताच मी सिनेमे पहात नाही.

**दमयंती :** पण शेवटचं दृश्य काय भयंकर घेतलंय नाही ! (नकळत उठते) तो प्रचंड धबधबा कोसळतोय आणि त्या लाकडी पुलावरून ती बाई सारखी पळतेय. तिच्यामागून तिचा नवराही धावतोय. हातांत पिस्तुल घेऊन. तो धबधबा—तो प्रचंड आवाज—तो पाठलाग—बाप रे. विलक्षण ताण पडतो मनावर. आणि ती शेवटची किंकाळी. कशी काळीज आरपार कापीत गेली.

**घनश्याम :** म्हणूनच म्हणतो की नकोच ते सिनेमे आणि नकोच तो ताण. पैसे खर्च करायचे अन् फुकटचा त्रास विकत घ्यायचा. थिएटरच्या बाहेर आपण पडलो ना तेव्हां मला कसं मोकळं वाटलं.

**दमयंती :** (आपल्याच नादांत) खरंच का रे माणसं एकमेकांचा इतका तिरस्कार करूं शकतात श्याम ? इतका द्वेष ? काय खून चढला होता त्या माणसाच्या डोळ्यात. झाली असेल बेमान. पण म्हणून काय झालं ? त्यानं तिचा असा खून करायला नको होता. काही झालं तरी तिचा असा प्राण घ्यायला नको होता. एकदा मेल्यावर माणूस फिरून जिवंत होईल का कधी ? उगीच मारलं त्यानं तिला. पाहिजे तर सोडून द्यायची होती. नाहीतर क्षमा करायची होती. पण प्राण कां म्हणून घेतला ? खून कां म्हणून केला तिचा ? तिचं जीवन तिच्यापासून हिरावून का घेतलं ? इतकं प्रेम होतं ना त्याचं तिच्यावर ? तिचे केस—तिचं हसणं—तिचं चालणं—इतकं आवडत होतं ना त्याला ? ती नुसती दिसली तरी त्याच्या डोळ्यांतून आनंद कसा ओसंडत होता. मग त्याच्यानं तिला मारवलं कसं ? प्रेम इतकं भयंकर असतं का रे श्याम ?

**घनश्याम :** मरू दे ना त्या बाईला तिकडं. तू कशाला दुःख करीत बसली आहेस ? उगीच खुळचट कल्पना डोक्यात घेऊन त्यांच्याशी खेळत बसायची तुला वाईट खोड आहे. भावनांच्या फार आहारी जातेस बघ तू. (घनश्याम

तिला जवळ घेऊन तिच्या केसांवरून हात फिरवतो. तिची हनुवटी उचलून धरीत तिच्याकडे पहात.) किती छान दिसते आहेस तू दमयंती. लाडक्या, हस ना. माझ्याकडे बघ—हं—नीट मान वर करून. (ती हसते.) दॅटस् गुड—किती सुंदर—खरोखरी सुंदर. तुला एक सांगू दमयंती. तुझे डोळे आहेत ना ते एकसारखे हसत असतात आणि तू हसायला लागलीस ना म्हणजे मग तर ते असे काही हसू लागतात की बस्स.

**दमयंती** : (मान बाजूला करीत) पुरे हं. किती वेळां तेंच तेंच सांगशील. रोज उठून आपलं त्याच डोळ्यांचं तेंच कौतुक.

**घनश्याम** : अग रोज सांगेन—रोज तेंच सांगत आलों आणि फिरून रोज तेंच सांगेन—कितीदां बघितलं तरी तुझे हे डोळे मला रोज नवीनच दिसतात. तू हसायला लागलीस ना की असं वाटतं—नेमकं काय वाटतं ते शब्दांत सांगता येत नाही बघ. अशा वेळीं मला कविता करतां येत नाहीत याचं फार वाईट वाटतं. मी कवि असतो ना तर रोज तुझ्यावर कविता केल्या असत्या. पण मी पडलो बोलून चालून इंजीनिअर.

**दमयंती** : हे बघ, आपण दोघे म्हातारे झालो ना म्हणजे मग दोघंही एकमेकांवर कविता करीत बसू. तू माझ्यावर आणि मी तुझ्यावर. म्हणजे मग म्हातारपणीं वेळ कसा घालवायचा हा प्रश्न पडणार नाहीं दोघांना. बाकी म्हातारपणीं तरी तुला तुझ्या धंद्याचा विसर पडणार आहे की नाहीं कुणास ठाऊक!

**घनश्याम** : म्हातारपणीसुद्धां तुझ्यावर इतकंच आणि असंच प्रेम करीन. तुला असंच जपेन. आता माझ्या धंद्यावर माझं प्रेम आहे. कबूल. पण हे सारं मी कां करतो दमयंती? कशासाठीं मी एवढा श्रमतो, धडपडतो?

**दमयंती** : कशासाठी?

**घनश्याम** : विचार तूच आपल्या मनाला.

**दमयंती** : सांगू? तू हुषार आहेस, कर्तबगार आहेस, महत्वाकांक्षी आहेस म्हणून. स्वस्थ बसून तुला कध्धी कध्धी चैन पडणार नाही. काम नसलं की तू किती अस्वस्थ होतोस हें मला माहित आहे.

**घनश्याम** : चुकलीस तू. अग, ही सारी धडपड मी तुझ्यासाठी करतो. तू नसतीस तर हा एवढा मोठा धंदा उभारायचं मला काय कारण होतं? कॉलेजांत शिकत असताना मी तुला प्रथम पाहिली. पाहाताक्षणी तू मला आवडलीस. मी तुझ्या प्रेमांत पडलो—अगदी गळ्यापर्यंत बुडलो. बघ—ती तेव्हांची आठवण काढताक्षणीच माझ्या अंगावर कसे रोमांच उभे राहिलेत पहा. अजून—अजून तशीच दिसते आहेस तू मला—पहिल्यांदा पाहिली होती तशी. आठवतं तुला?

**दमयंती** : (उठत) हो आठवतं. मी नुकताच कॉलेजात प्रवेश मिळवला होता. पावसाचे दिवस होते ते. त्या दिवशी आभाळ खूप भरून आलं होतं. कॉलेज सुटलं आणि एकदम पाऊस पडायला सुरुवात झाली. ऐन दुपारीं सगळीकडे काळोख दाटून आला आणि सरीमागून सरी कोसळायला लागल्या. मी आणि माझी मैत्रीण रस्त्याच्या कडेला आडोसा शोधून उभ्या राहिलो. पाऊस काही केल्या थांबेचना. विजाही चमकत होत्या. मी खूप खूप घाबरले होते. तशीच मैत्रिणीला बिलगून उभी होते.

**घनश्याम** : आणि समोरच्या फूटपाथवर तुझ्याकडे पहात मी उभा होतो. एका हातानं पुस्तकं आणि दुसऱ्या हातानं साडी सावरीत तू पावसात कुडकुडत उभी होतीस. खूप भिजलीही होतीस. आणि किती बावरली होतीस. सारखी आकाशाकडे पहात होतीस. तुझ्या पापण्या सारख्या फडफडत होत्या. तुझं लक्ष नव्हतं. पण मी टक लावून तुझ्याकडेच पहात उभा होतो. बरोबर मर्लिन होता. मी मर्लिनला विचारलं, 'कोण रे ही?' मर्लिन म्हणाला 'माहीत नाहीं—पण नवीन दिसतेयू' आणि मग मी म्हणालो—काय म्हणालो सांगू—बाकी अनेक वेळा मी तुला सांगितलंय तें—

**दमयंती** : सांग—पुन्हा सांग—सगळं कसं अगदी ताजं वाटतंय ह्या क्षणीं—

**घनश्याम** : मी म्हणालों—'मस्त आहे.'

**दमयंती** : इश्श.

**घनश्याम** : अजून तश्शीच लाजतेस. त्या दिवशी पावसांत कशी मस्त भिजली होतीस. थोड्या वेळानं पाऊस थांबला—

**दमयंती** : आणि आम्ही खिदळत खिदळतच रस्त्यावरून चालायला लागलों—

**घनश्याम** : तुमच्या मागून आम्हीहि निघालों. तुझ्यामागं मीही त्या हॉटेलांत घुसलो. मी तुझा पाठलाग केला म्हणून तू माझ्यावर रागावलीस.